दै. गोदातीर दि. ०६.०६.२५

# शहरातील आठ सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड शहर, सिडको, हडको, विष्णुपुरी आदी परिसरात सतत गुन्हेगारी करून दहशतीचे वातावरण पसरविणाऱ्या अट्टल आठ सराईत गुन्हेगारांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहेत. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या अहवालावरून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रीय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्या संबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यातील कारवाई वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगारांना हद्दपार तसेच स्थानबद्ध करणे संबंधाने कारवाई सुरू आहे.

नांदेड जिल्हयामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी एमपीडीएअंतर्गत सन २०२४ मध्ये एकुण १३ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले असून सन २०२५ चालू वर्षामध्ये १० सराईत गुन्हेगारांस कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४ ते २०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ प्रमाणे एकूण ८७ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ प्रमाणे एकुण ११ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सराईत गुन्हेगार यांच्यावर गंभीर दुखापत, अवैध शस्त्र बाळगणे अशा दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती एकत्रित केली. त्यांच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा होत नसल्याचे दिसून आल्याने, त्यांच्याविरुध्द कायदेशीर कागदपत्रांची जुळवणूक करण्यात आली. त्यानंतर ऋत्विक गोपाळ पदमवार (वय २२ वर्ष, रा. विष्णुपुरी), आकाश ऊर्फ टमाट्या आनंदराव कदम (वय २१ वर्ष रा. राहुलनगर वाघाळा), दिलीप पुंडलीकराव डाकोरे (वय २७ वर्ष रा. रविनगर, कौठा), ज्ञानेश्वर नरहरी पुंडवय (वय ३४ वर्ष रा. कौठा) व इतर ४ जणांना हद्दपार करण्यात आले. त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (ब) प्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे एकूण ३४ प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुराव करुन उपविभागीय दंडाधिकारी, नांदे यांच्याकडून हद्दपार प्रस्ताव मंजुर क वरील ८ इसमांना नांदेड जिल्ह सहा महिन्यांकरिता हद्दपार कर आले आहे.